close २१वी बैठक
215

Mangrove Committee (215)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते


महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/८६७१४/२०२३ दिनांक: ३० /०५/२०२३

प्रति,
मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

उप वनसंरक्षक ... कक्ष, मुंबई
(समिती)
73
24/07/2023
मुख्य लेखापाल ... उप वनसंरक्षक

विषय:- उरण बोरीपाखाडी खाडी (कोटनाका स्मशान भुमी) इथे कांदळवन कत्तल होत असल्याबाबत. (तक्रार अर्ज क्र. २१५)

संदर्भ:- आपलेकडील पत्र जा.क्र./ल.ले./का.स/२८०/सन २०२२-२३ दिनांक १७/०२/२०२३.

Mangrove Comm.

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. जितेंद्र रमेश उरणकर, ता. उरण जि.रायगड यांनी आपल्या कार्यालयाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार उरण यांनी चौकशी केली असून उपविभागीय अधिकारी, पनवेल त्यांचेकडील दि. ११/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

## कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. जितेंद्र रमेश उरणकर, ता. उरण, जि. रायगड, दिनांक ०९/०२/२०२३. |
| २. | तक्रारीचा विषय | उरण बोरीपाखाडी खाडी (कोटनाका स्मशान भुमी) इथे कांदळवन कत्तल होत असल्याबाबत. |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | बोरीपाखाडी, ता. उरण जि. रायगड |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) श्री. अनिल पाटील- मंडळ अधिकारी, उरण<br>२) श्री. प्रशांत शेगोकार - तलाठी सजा, उरण<br>३) श्री. सुनिल महाडिक, वनपाल घारापुरी (अति कार्यभार कांदळवन) परिक्षेत्र वन अधिकारी कार्यालय उरण<br>४) श्री. आशा वाळे, वनरक्षक उरण, परिक्षेत्र वन अधिकारी कार्यालय उरण |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | अर्जदार यांनी नमूद केलेली जागेची दि. ०४/०५/२०२३ प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता बोरीपाखाडी हद्दीतील जागा ही सिडको संपादीत आहे. बोरीपाखाडी येथील स.नं. १८०/१/अ/१ यामध्ये उरण बायपास रस्त्याचे काम जे.एम.हात्रे कंपनीतर्फे चालु असून सदर ठिकाणी कांदळवनाची झाडे तुरळक प्रमाणात तोड झाल्याचे आढळून आले आहेत. सदरच्या क्षेत्रातील कांदळवन तोडणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन स्टॅम्प नं. ५९४८/२०२० मध्ये आनंदी हॉटेल ते उरण सिटी द्रोणागिरी, नवी मुंबई या जागेपर्यंत परवानगी देणेत आलेली आहे. तसेच सदरच्या क्षेत्रातील कांदळवन तोडणेबाबत मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी दि. २२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये व मा. उपवनसंरक्षक, अलिबाग यांनी दि. २९/०४/२०२२ रोजीच्या ज्ञापनाव्दारे परवानगी दिलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | सदर कामास सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आहे. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन स्टँम्प नं. ५९४८/२०२२ मध्ये आनंदी हॉटेल व उरण सिटी द्रोणागिरी नवी मुंबई या जागेपर्यंत परवानगी देणेत आलेली आहे. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन स्टँम्प नं. ५९४८/२०२० नुसार परवानगी असल्याने गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न येत नाही. |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहेत.

(डॉ. योगेश म्हसे)
**जिल्हाधिकारी रायगड**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)

नोंदणीकृत कार्यालय :
'निर्मल' दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ००-९१-२२-६६५० ०९००
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९

मुख्य कार्यालय :
'सिडको' भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६

संदर्भ क्र. सिडको/नियोजन/व. नि. पर्या.(प्र.) /२०२३/584

दिनांक : ०५/०७/२०२३

प्रति
अपर मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष
मुंबई, यांचे कार्यालय
302, वेकफिल्ड हाऊस,
3रा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई 400001.

**विषय :** उरण बोरीपाखाडी कोर्ट नाका स्मशान भूमी इथे कांदळवन कत्तल होत असल्याबद्दल ( तक्रार क्र. 215)
**संदर्भ :**1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांचे दिनांक 17/ 02/ 2023 रोजीचे पत्र.
2) अधिक्षक अभियंता यांचे पत्र क्रमांक सिडको/ अ. अ ( द्रोण. उलवे) /2023/ 478
दिनांक 17/ 05/ 2023.

महोदय,

उपरोक्त विषयांकित पत्रान्वये श्री जितेंद्र रमेश उरणकर यांनी दाखल केलेली तक्रार क्र. 215 या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारी बाबत असे कळविण्यात येते की, श्री. जितेंद्र रमेश उरणकर तक्रारदार यांनी नमुद केलेल्या जागेबाबत सिडकोने उच्च न्यायालयाच्या परवानगीसह सर्व लागणाऱ्या आवश्यक परवानग्या घेऊनच उरण बायपास रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे आणि सिडकोमार्फत कोणत्याही कायदेशीर बाबींचे उल्लंघन करण्यात आलेले नाही, याची कृपया आपण नोंद घ्यावी. याबाबत अधिक्षक अभियंता (द्रोण व उलवे), सिडको यांचे पत्र क्र. सिडको/ अ. अ ( द्रोण. उलवे) /2023/ 478 दिनांक १७/०५/२०२३ अन्वये श्री. जितेंद्र रमेश उरणकर यांना माहिती देण्यात आलेली आहे. सदर पत्र आपल्या माहितीस्तव सोबत जोडलेले आहे.

21 JUL 2023
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1203
प्रशासकीय अधिकारी
12 JUL 2023
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

आपला विश्वासू,

वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण)- प्र
सिडको,

प्रत माहितीस्तव सादर
१) व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष सिडको
२) सह-व्यवस्थापकीय संचालक – २, सिडको

सिडको/अ.अ. (द्रोण व उलवे)/२०२३/478 दि. १७.०५.२०२३

प्रति.

श्री. जितेंद्र रमेश उरणकर,

उरण कोळीवाडा. तहसिल कार्यालय समोर,

ता. उरण. जि. रायगड — ४०० ७०२.

विषय - प्रस्तावित उरण बायपास रस्त्याच्या संरेखनामधील खारफुटींची तोड करण्यात आलेबाबत.

संदर्भ — १. अर्जदार श्री. जितेंद्र रमेश उरणकर यांचेकडील पत्र क्र. निरंक, दि. १०.०२.२०२३.

२. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. सिआयडी- ३३२३/सं.क्र.२७८, ३७७, ३८०-३९०, ३९२, ४०२-४०५/प्र.क्र.१६/नवि -१०, दि. १३ मार्च, २०२३.

३. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. Complaint २०२३/ CR २१/TC ४/२०२३, दि. १६.०३.२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकित आपलेकडील संदर्भीय पत्र क्र.१ या कार्यालयास, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय व अवर सचिव, पर्यावरण विभाग, MCZMA, मंत्रालय यांचेमार्फत प्राप्त झाले असून आपणास कळविण्यात येते की, नागरी लष्करी संपर्क परिषद (CMLC-2016) दरम्यान, नौदलाने माहिती दिली होती की, INS तुनीर आणि NAD करंजा यांजकडून उरण शहरामध्ये येणारी अवजड वाहनांची वाहतुक होते. हि वाहतूक शहराच्या बाहेरुन वळविण्यासाठी जून २०१७ मध्ये झालेल्या बैठकीत उरण बायपास रस्ता या प्रकल्पाचे काम तातडीने हाती घेण्याची विनंती भारतीय नौदलाने केलेली होती. तसेच, उरण शहरातील अरुंद आणि गजबजलेल्या रस्त्यामुळे शहराच्या दाट वस्ती विभागात होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीची समस्या सोडविणे गरजेचे होते.

त्यानुसार, सिडकोमार्फत नियोजित उरण बायपास रस्ता या प्रकल्पाचे काम कंत्राटदार मेसर्स जे.एम.म्हात्रे यांना देण्यात आले आहे.

CamScanner

सिडकोने सदर उरण बायपास रस्ता कामासाठी मिळविलेल्या आवश्यक त्या परवानग्या खालीलप्रमाणे :

५) माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ५९४८/२०२० संदर्भात दिनांक १६.१२.२०२० च्या आदेशाद्वारे खारफुटी साफ करण्यास परवानगी दिली आहे.

६) SEIAA ने दि. २९.०३.२०२२ रोजीच्या प्रस्तावाला किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) मंजूरी दिली आहे.

७) CCF, ठाणे यांनी खारफूटी काढण्यासाठी आणि काम सुरु करण्यासाठी दि. २२.०४.२०२२ रोजी परवानगी दिलेली आहे.

८) DDGF (मध्य) नागपूर यांनी दि. ०८.१२.२०२२ रोजी वन कायदा १९८० च्या कलम २ अंतर्गत ०.६६ हेक्टर क्षेत्र उरण बायपास प्रकल्पासाठी खारफुटीची वन जमीन वळविण्यासाठी वनमंजूरीला "अंतिम मान्यता" दिली आहे.

उच्च न्यायालयाच्या परवानगीसह सर्व आवश्यक वैधानिक परवानग्या घेवूनच सिडकोमार्फत उरण बायपास रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे आणि सिडकोमार्फत कोणत्याही कायदेशीर बाबींचे उल्लंघन करण्यात आलेले नाही.

माहितीस्तव सादर.

आपला विश्वासू,

अधिक्षक अभियंता (द्रोण व उलवे)
५ वा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई – ४०० ६१४.

प्रत –
१. मुख्य अभियंता (नवी मुंबई)
२. कार्यकारी अभियंता (द्रोण -१)

CS CamScanner